## क्रांतिसिंह नाना पाटील

डॉ. कृष्णकांत

श्रीनाना रामचंद्र पाटील यांचा जन्म ३ ऑगस्ट १९०० रोजी ता. वाळवा जि. सांगली येथील येडेमच्छिंद्र या गावी झाला. तर आईचे नाव गोजराबाई. पिसाळ (पाटील) यांचे वाड्यात माणसांची ददात नव्हती. सारेजण कष्ट करुन गुण्यागोविंदाने नांदत होते. रामचंद्र पाटील यांना सदाशिव, महादेव व राघू असे तीन भाऊ होते. त्यांची बायका मुले सारे एकत्र कुटुंब.

रामचंद्र पाटील यांना नाना, ज्ञानू व दादा अशी तीन मुले व शेवटची गंगूबाई ही मुलगी अशी एकूण चार अपत्ये. पोटापुरती शेती, गाई – म्हशींचे खिल्लार, घराणे कष्ट करुन खाऊन–पिऊन सुखी. श्रीमंत नव्हे, समृध्द छोटे कष्टकरी शेतकरी. वाड्याला सुसंस्कार, वारकरी संप्रदाय, शाकाहार, कुस्ती अशा परंपरांचा वारसा. गावात, परिसरात, शेतकऱ्यात प्रतिष्ठा लाभलेली.

नाना पाटलांना पाळण्यातच पंढरपूरची माळ घालण्यात आलेली. संत तुकारामांच्या, गाडगे महाराजांच्या विद्रोही वारकरी परंपरेचे सखोल संस्कार बालपणीच नाना पाटलांचेवर झालेले.

त्या काळात बहुजन समाजात म. जोतिराव फुले यांच्या प्रभावातून शिक्षणाचे नवे वारे सुरु झाले होते. काही जाणकार माल आपल्या मुलांना शिकविण्याचा रोमांचकारी छंद जोपासत होते. कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी सुरू केलेल्या शिक्षणप्रसाराच्या कामाचे काही परिणाम परिसरात जाणवत होते. पण उत्पादक हितसंबंधाच्या रूपात बहुजन समाजाने अजूनही शिक्षण स्वीकारले. नव्हते. सर्वदूर महाराष्ट्रात शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नव्हत्या. मुलांना शिकणे आवडत नव्हते. सातवीची परीक्षा देण्यासाठी शंभर शंभर किलोमीटर अंतरावर जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागत होते. तरीही आजीच्या आग्रहातून आणि स्वतःच्या प्रयत्नांतून सातवी पासपर्यंतचे शिक्षण त्यांनी पूर्ण केले. त्या काळात ग्रामीण शेतकऱ्यांत एवढे शिक्षण म्हणजे फारच झाले असे मानले जायचे नाना पाटील पहिली दोन वर्षे गावातच शिकले. पुढची दोन वर्षे एका रामदासी बुवाबरोबर राहून दुधोंडी या गावात त्यांनी शिक्षण घेतले. पुढे जुने खेड आणि बहे येथे पाहुण्यांच्या घरी राहून दररोज दहा किलोमीटर चालत जाऊन नाना पाटील यांनी पाचवी ते सातवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. आपल्या विद्यार्थीदशेत नाना पाटलांनी भरपूर वाचन आणि लेखन केले. त्यांचे हस्ताक्षर मोत्यासारखे सुंदर होते. नियमितपणे डायरी लिहिण्याचा छंद त्यांनी जोपासला होता. वाचलेल्या पुस्तकांच्या संदर्भात मुद्देसूद नोटस् ते काढत असत. राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि वारकरी संप्रदायाच्या संदर्भातील अनेक उपलब्ध पुस्तके त्यांनी शिस्तबध्दपणे अभ्यासली होती. एक शिक्षक आणि विद्यार्थिप्रिय विद्यार्थी म्हणून ते ओळखले जात.

### अव्वल दर्जाचे तत्त्वचिंतक व वक्ते

नाना पाटील मूलतः अभ्यासू, चिंतनशील प्रवृत्तीचे. संशोधकाला आवश्यक अशी चिकित्सक वृत्ती लाभलेले. तर्कशुध्द, विज्ञाननिष्ठ पध्दतीने विचार करणारे, गंभीर, तत्त्वनिष्ठ व्यक्ती होते. त्यांचे चारित्र्य, समर्पण वृत्ती, तळमळ, तरलस्पर्शी विचारपध्दती आणि ध्येयवाद हे सारे अव्वल दर्जाच्या तत्त्वचिंतक बंडखोर क्रांतिकारकाचे त्यांने जाणीवपूर्वक जोपासलेले, घडविलेले, विकसित केलेले व्यक्तिवैभव होते. नाना पाटलांचे चळवळीत येणे आणि जनतेच्या विश्वासाला पात्र क्रांतिनेता बनणे हा अपघात नव्हता. योगायोग नव्हता. क्रांतिसिंह काळावर आरुढ झालेले क्रांतिकारक नव्हते. आपल्या कार्यपरिसरात त्यांनी दीर्घकाळ व्रतस्थ राहून केलेल्या तपश्चर्येचे ते फळ होते.

खादीचा साधा पांढरा शुभ्र लांबसडक नेहरू शर्ट, खादीची सैलपणे बांधलेली लुंगी, डोकीवर कधी गांधी – टोपी, कधी कोल्हापुरी पैलवानी पध्दतीचा पटका हाच त्यांचा सततचा वेष राहिला. १९२० ते १९३० या काळात काही वेळा अपवाद म्हणून त्यांनी उंची मलमलचे धोतर,चायनासिल्कचा शर्ट, उलनचा कोट, कोशा–पटका किंवा मंदील वापरला. पायात महागडे बूट वापरले. पण ते काही काळच. नाना पाटील सतत ग्रामीण ढंगीच्या स्वतः कमावलेल्या अस्सल गावरान गावठी भाषेत बोलत राहिले. विनोदी पध्दतीने विषय मांडणीची शैली त्यांनी विकसित केली होती. आपले व्याख्यान त्यांनी दीर्घसूत्रावर बेतलेले असे. सोप्या गोष्टी, विनोदी किस्से, लोककथा सांगत सांगत आपले स्वीकृत प्रमेय ते श्रोत्यांच्या गळी उतरवत राहत. त्यांच्या भाषणाचा प्रभाव व्यापक, सखोल आणि दीर्घकाळ टिकणारा असायचा. त्यात हासू, आसू, खेद, विषाद, टीका, आत्मभान, आत्मविश्वास, लोकनैतिकतेचा आदर, दंभस्फोटकता, संस्कृतीचे दर्शन, शोषणमुक्तीची आस, अन्यायाविषयीची चीड अशी एकाहून एक आयुधे असायची की त्यामुळे त्यांचे व्याख्यान ऐकणे एक स्वतंत्र अनुभव असायचा. 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' असे त्यांचे रूप असायचे. 'बुडती हे जन देखवेना डोळा' या भूमिकेने नाना पाटील बोलत रहायचे. त्यामुळे त्यांचा श्रोता अनुयायी बनायचा. नाना पाटलांच्या शब्दांवर फिदा होऊन अनेकांनी हौतात्म्य पत्करले. कितीतरी लोकांनी आयुष्यभराचे दारिद्र आणि कष्ट सहन केले. नाना पाटलांच्या शब्दांना मंत्राचे सामर्थ्य लाभले ते शब्दांच्या पाठीमागच्या सात्विकतेमुळे, स्वराच्या पाठीमागच्या थरथरणाऱ्या भावनेमुळे, विनोदाच्या पाठीमागच्या विषण्ण करणाऱ्या विषादामुळे.

नाना पाटलांचे हे रूप त्यांच्या हयातीत भल्याभल्यांना उमगले नाही. काहींना उमगले पण रुचले नाही. काहींना ते गावठी वाटायचे. काहींना वेळखाऊ वक्ते वाटायचे. काहींना त्यांचा बहुजनवादी ध्येयवाद बोचायचा. असे लोक नाना पाटलांविषयी काहीबाही बोलत रहायचे. त्यांच्याविरोधी आघाड्या उघडायचे. काही लोक त्यांच्या सभा उधळण्याचा अयशस्वी प्रयत्न करायचे. या साऱ्याच्या पाठीमागे छुपा व्यक्तिद्वेष असायचा. पण तो कोणाच्याही बाबतीत यशस्वी झाला नाही. नाना पाटलांच्यावर मनापासून प्रेम करणाऱ्या सर्व दूरच्या कष्टकरी जनतेने हे सारे कुटिल डाव उधळून लावले आणि नाना पाटलांना जनतेचा क्रांतिसिंह बनविले.

काही लोकांनी नाना पाटलांना मनस्ताप दिला. पण अनेकांनी त्यांचा सदैव आदरच केला. पं. जवाहरलाल नेहरू नाना पाटलांचा सदैव सन्मान करायचे. त्यांचे ऐसेपैसे व्यक्तिमत्त्व नेहरूंनी मुळातून समजून घेतले. १९३२ साली कराडच्या सभेत नेहरूंनी नाना पाटलांचे दीर्घ भाषण ऐकले आणि ''जब ऐसे पहेलवान हमारे साथ हैं तो अब दिल्ली कितनी दूर है?'' असा सवाल श्रोत्यांनाच विचारला होता.

राममनोहर लोहिया नाना पाटलांच्यावर मनापासून प्रेम करायचे. एके ठिकाणी नाना पाटलांच्याविषयी बोलताना ते म्हणाले, ''ये आदमी कभीकभी बोलते वक्त जादा गुस्सा करता हे। ये पोलिटेशियन कम और क्रांतिकारी जादा है। अगर ये आदमी थोडासा गुस्सा भी जायेगा तो पुरा भारतका नेता होगा। ऐन चळवळीच्या काळात आपला जीव धोक्यात घालून भाऊसाहेब नेवाळकरांना बरोबर घेऊन अच्युतराव पटवर्धन नाना पाटलांना भेटायला. त्यांच्याबरोबर बोलायला कुंडलला आलेले होते. साने गुरुजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गाडगेमहाराज, कॉ. एस. ए. डांगे, एस. के. लिमये, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, आचार्य अत्रे, मास्टर विनायक अशा कितीतरी मोठ्या मंडळींनी नाना पाटलांना आदर, प्रेम स्नेह आणि सदिच्छा दिल्या.

**प्रतिसरकारचा नेता**

१९४२ च्या चले जावच्या लढ्यानंतर सातारा जिल्ह्यात ऐतिहासिक स्वरूपाचे प्रतिसरकार उभे राहिले. हे प्रतिसरकार छोट्या–मोठ्या अठरा गटांत विभागले होते. या चळवळीत जीवावर उदार होऊन हत्यारे घेऊन उठलेले पाचशेच्या वर क्रांतिकारक संघटित झाले होते. या लढ्यात अनेकजण हुतात्मे झाले. क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या एका गटातील हुतात्मा किसन अहिर, नानकसिंग, बाबूराव कोकाटे आणि प्रताप पाटील हे हुतात्मे झाले. या सर्व हुतात्म्यांनी आणि क्रांतिकारकांनी प्रतिसरकारचे प्रमुख प्रेरणादायी नेते म्हणून क्रांतिसिंह नाना पाटलांनाच मान्यता दिली. कॉ. दत्ता देशमुख आणि क्रांतिवीर नागनाथ आण्णा नायकवडी यांनी क्रांतिसिंह नाना पाटलांच्या मानसन्मानांना आपल्या श्वासाहून अधिक महत्त्व दिले. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या वगनाट्यातील नायक उभे करताना क्रांतिसिंह नाना पाटलांचे व्यक्तिमत्त्वच समोर ठेवले होते.

श्रमिकांचा कैवारी

बालपणापासून नाना पाटील जिज्ञासू, अतिसंवेदनशील, झुंजार होते. ते सतत फिरत असत. ते कमालीचे माणूसवेडे होते. नवी नवी माणसे जोडणे, त्यांच्या व्यथा, वेदना, प्रश्न तासन्तास ऐकून घेणे, हे प्रश्न कसे सोडविता येतील याचा विचार करणे, मार्ग सुचला की तो प्रश्न सोडविण्याची चळवळ सुरू करणे, माणसे पेटविणे, त्यांना कृतिशील बनविणे, प्रश्न मार्गी लावला की, नेतृत्वाचा सातबारा सांभाळत तेथेच बसून न राहता नव्या, अधिक अवघड प्रश्नाकडे मरणाच्या तयारीने झेपावणे ही त्यांची कार्यपध्दती होती. खेड्यातला छोटा कष्टकरी शेतकरी, शेतमजूर, बलुतेदार, स्त्रिया, दलित, फिरत्या जमाती, मुंबईतला कामगार हा त्यांचा खरा जीवनसखा होता. १९५७ साली या गरीब कष्टकऱ्यांनी नाना पाटलांना खासदार म्हणून दिल्लीला पाठविले. १९६७ साली बीड जिल्ह्यातल्या ऊसतोडणी मजुरांनी नाना पाटलांना पोत्याने मते दिली आणि पुन्हा लोकसभेत पाठविले. गाडी हमालाच्या बैलगाडीत बसून लोकसभेकडे जाणारा हा एकमेव खासदार होता. कॉ. इंद्रजित गुप्ता, कॉ. गीता मुखर्जी, साथी नाथ पै, साथी मधू लिमये, राम मनोहर लोहिया अशा तरुण खासदार नेत्यांच्या चांगल्या भाषणांना गहिवरून साद घालणारे ते भावनाप्रधान लोकप्रतिनिधी होते.

नाना पाटलांचे बालपण विविध चळवळींच्या प्रभावक्षेत्रात गेले. त्यांच्या बालपणी शाहू महाराजांनी कोल्हापुरात समतेचे, विधायकतेचे अनेक प्रयोग सुरु केले होते, बालपणी नाना पाटलांच्यावर संत तुकारामांच्या विद्रोही विचारांचा प्रभाव पडला. पुढे सत्यशोधक चळवळीच्या आणि तत्त्वज्ञानाच्या प्रभावात येऊन नाना पाटील फुलेवादी बनले. १९१४ साली महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली खेड, ता. वाळवा, येथे शेतकऱ्यांची मोठी परिषद झाली. १९१६ साली महाराष्ट्रात डेक्कन पार्टी नावाचा बहुजनांचा राजकीय पक्ष आकार घेऊ लागला. पुढे या पक्षाचे ब्राह्मणेत्तर पक्षात रूपांतर झाले. १९१९ कर्मवीर भाऊराव पाटलांनी काले, ता. कराड येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. याच वर्षी महाराष्ट्रात शाहू राजे आणि पुढे १९२२ साली मद्रासमधून पेरियार यांनी जातीय निवाड्याची मागणी केली. माणगावच्या परिषदेमध्ये शाहू राजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सत्कार केला. भारताच्या राजकारणात म. गांधींनी प्रवेश केला. याच काळात भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली. बाबासाहेबांनी भारतीय राजकारणात प्रवेश केला. गाडगे महाराज पश्चिम महाराष्ट्रातील कीर्तनाचे फड गाजवू लागले. या सर्व घटनांचा तरुण नाना पाटलांच्या मनावर अनुकूल परिणाम घडत होता. शिक्षण संपवून सत्यशोधक चळवळीचा पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून ते काम करु लागले. एक झंझावाती प्रबोधक कार्यकर्ता म्हणून ते गावोगावी सभा गाजवू लागले. अंधश्रध्दा निर्मूलन फुले पध्दतीचे लग्न, दारूबंदी, शेटजी–भटजीच्या शोषणातून बहुजनांची मुक्ती, कर्मकांडांना, उपासतापासांना फाटा देण्याचा आग्रह, साक्षरता प्रसार, स्त्रीशिक्षण, शिक्षण प्रसार, अस्पश्यता निर्मूलन, भावकीतील भांडणे टाळणे, उत्पादकता, काटकसर अशा विषयांवर भर देऊन नाना पाटील बोलत राहत.

१९४२ च्या चले जावच्या लढ्याचे प्रभावी लोकसंघर्षपर्व ओसरल्यानंतर नाना पाटलांनी सातारचे प्रतिसरकार ३ ऑगस्ट १९४३ पासून सुरू केले. मे १९४६ पर्यंत जिद्दीने ते चालविले. ४४ महिन्यांच्या या भूमिगत काळात नाना पाटलांना अनेक वेळा अग्निपरीक्षा द्यावी लागली. मृत्यू अनेक वेळा त्यांना स्पर्श करून गेला. सदासर्वकाळ यश–अपयश, सुख–दुःख, जीवन–मृत्यू यांचा पाठशिवणीचा खेळ त्यांना पहावा लागला, खोलेवाडी, खेड, दुधोंडी, कुंडल, कुंभारगांव, चिखलगोठण, पारे, आटपाडी, असा भूमिगत मुक्कामाचा प्रवास चालू असताना चिखलगोठण येथे इनामदारांच्या वाड्यातून पांडुरंग गुरवांच्या बसक्या पत्र्याच्याभुसकाटाच्या घरात राहावे लागे. चाचण, डास चावून अंगाची खाज सुटू लागली. एक नाग अनेक वेळेला आढ्यावरून सळसळायचा. बाहेर ब्रिटिश पोलिसांच्या बुटांचे आवाज ऐकू यायचे. तब्बेत पूर्ण बिघडलेली. आता आपण जगत नाही असे वाटू लागले. नाना पाटलांनी उपलब्ध कार्यकर्त्यांना बोलावून घेतले आणि सांगितले, ''आता माझे काही खरे नाही. काळ जवळ आलेला दिसतोय. काही भलेबुरे घडलेच तर रडत बसू नका, मी मेलोय असे कुणालाही सांगू नका. एकट्या सुरेश बाबूला (नाथाजी लाड) बोलावून घ्या. गुपचूप शांतपणे अंत्यविधी उरका. मी अचानक नाहीसा झालो, पळून गेलो, मी जीवंत आहे. इतरत्र चळवळ वाढविण्यासाठी गेलो आहे, गुप्तपणे तुमच्या संपर्कात आहे असे सांगत रहा. देश स्वतंत्र होईपर्यंत असेच सांगत रहा. मी मेलो असे कळले तर माझी लढणारी पोरे अस्वस्थ होतील, धीर सोडतील. आपल्या चळवळीचा घात होईल. तेवढे होऊन देऊ नका.

**कष्टकऱ्यांच्या चळवळीत अग्रेसर**

१५ ऑगस्ट १९४७ नंतर एक दोन वर्षे नाना पाटील शेतकरी कामगार पक्षात राहिले. काही काळ लाल निशाण पक्षात राहिले. १९५३ साली ते भारतीय कम्युनिस्ट पक्षात दाखल झाले. या पक्षाच्या व्यासपीठावरून अखेरपर्यंत कामगार कष्टकऱ्यांच्या चळवळीत अग्रेसर राहिले. इस्कसमार्फत रशियाचा दौरा केला. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, चीनविरोधी युध्द, अखिल भारतीय किसान सभा, अखिल भारतीय शेतमजूर सभा, भूमिहीन शेतकऱ्यांची चळवळ, कामगार चळवळ, महार वतन मुक्तीची चळवळ, धरणग्रस्त चळवळ अशा कष्टकऱ्यांच्या सर्व आघाड्यांवर ते अखंड लढत राहिले. तब्येत बरी नसताना आणीबाणीविरोधी लढणाऱ्यांना प्रेरणा देत राहिले.